North Asian International Research Journal of Social Science & Humanities

ISSN: 2454-9827 Vol. 9, Issue-4 April-2023

IRJIF I.F.: 3.015

Index Copernicus Value: 57.07 Indian Citation Index Thomson Reuters ID: S-8304-2016

NAIRJC *A Peer Reviewed Refereed Journal*

DOI: 10.5575/nairjssh.2023.10.8.5

# स्वरगंधर्व सुधीर फडके एक बहुआयामी व्यक्तिमत्व

[1]सुशील अ. वावरकर, [2] प्रो. डॉ. सौ. अर्चना अंभारे

[1]संशोधक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती तथा सहा. प्राध्यापक श्री गणेश कला महाविद्यालय, कुंभारी, अकोला

[2]मार्गदर्शक, संगीत विभाग प्रमुख, श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला

**सार :**

भारतीय संस्कृतीत विविध कलांचे संवर्धन करण्यासाठी महान गुरु शिष्य परंपरा प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. गुरु शिष्यांना सीनाबसीना तालीम देऊन तयार करायचे व त्यांना पारंगत करून संस्कार क्षम बनवायचे. सुधीर फडके अर्थात बाबूजी यांना त्यांचे गुरु वामनराव पाध्ये बुवा यांनी बालवयापासून शास्त्रीय संगीताचे योग्य शिक्षण देऊन शास्त्रात पारंगत केले. त्यानंतर बाबूजी महान संगीतकार व श्रेष्ठ गायक बनून जवळपास 50 वर्ष मराठी चित्रपट सृष्टीवर त्यांनी अधिराज्य गाजविले. त्यांनी अनेक हिंदी व मराठी चित्रपटातील गीतांना संगीत देऊन अजरामर केले. त्यांचे सुगम संगीतातील प्रभुत्व वादातीत आहे. बाबूजी संघाचे निष्ठावंत कार्यकर्ते व प्रखर देशभक्त होते. बाबूजींनी गदिमांचे गीत रामायण स्वरबद्ध केले व त्याचे गायन पुणे आकाशवाणी केंद्रावर वर्षभर प्रसारीत झाले. त्यानंतर बाबूजींनी गीतरामायणाचे देश विदेशात असंख्य प्रयोग केले. प्रस्तुत संशोधन लेखात स्वर गंधर्व सुधीरजी फडके यांच्या जीवन कार्याचा आढावा घेऊन त्यांच्या व्यक्तिमत्वाचे सांगीतीक क्षेत्रामधील बहुआयामी व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**मुख्य शब्द (key words) :-** स्वरबद्ध , मंत्रमुग्ध , पार्श्वगायन , अष्टपैलू , तंत्रशुद्ध.

**प्रस्तावना :**

सर्व ललित कलांमध्ये संगीत कलेचा उदय सृष्टीच्या निर्मिती बरोबरच झाला असे मानण्यात येते. सामाजिक परिवर्तने व संगीतातील परिवर्तने जणू हातात हात घालूनच चालत आल्याचे दाखले इतिहासात सापडतात. भारतीय ज्ञान परंपरेत भारतीय संस्कृतीतील विविध कलांचे संवर्धन करण्यासाठी महान गुरु शिष्य परंपरा अगदी प्राचीन काळापासूनच अस्तित्वात आहे. रामायण महाभारत काळापासूनच गुरुकुलात प्रतिभाषाली विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना पारंगत केले जात असे. तसेच भारतीय संगीत कलेत गुरु शिष्य परंपरेपासून आधुनिक संगीत शिक्षणाचा प्रवास आपल्याला पहावयास मिळतो. आधीच्या काळात ध्रुपद- धमार गायकी प्रचलित होती. त्यानंतर ख्याल गायकी अस्तित्वात आली. त्यासोबतच निरनिराळी घराणी तयार झाली. जसे ग्वाल्हेर, जयपुर, किराणा, आग्रा, दिल्ली, पटियाला इत्यादी. त्याचबरोबर नाट्य क्षेत्रातही अनेक सुधारणा होत गेल्या. गद्य नाट्यातून पद्य नाटकाकडे प्रेक्षक वळले. ज्यात भास्कर बुवा बखले, बालगंधर्व, छोटागंधर्व, दिनानाथ मंगेशकर इत्यादी उल्लेखनीय आहे. याच सुमारास भावगीत गायन हा प्रकार सुद्धा समाजात हळूहळू रुळू लागला. त्यात जे. एल. रानडे, जी. एन. जोशी, बाबुराव गोखले यांनी काव्य गायनाला सुरुवात केली. त्यानंतर गजाननराव वाटवे यांनी भावगीताचे पर्व सुरू केले. पुण्यात चौका चौकात होणाऱ्या भावगीत गायनाच्या कार्यक्रमाला श्रोत्यांची तुडुंब गर्दी असायची. आणि याच काळात सुगम संगीताच्या क्षेत्रात एक नाव पुढे येत होते ज्याने पुढे या प्रकारात तसेच हिंदी मराठी चित्रपटसृष्टीवर जवळपास 50 वर्ष अधिराज्य गाजविले आणि आपल्या सुमधुर चालींनी मराठी श्रोत्यांनाच नव्हे तर संपूर्ण भारतातील श्रोत्यांना डोलायला लावले व आपल्या भावपूर्ण गायनाने मंत्रमुग्ध केले. असे महान संगीतकार व गायक स्वरगंधर्व सुधीर फडके अर्थात बाबूजी. यांच्या काळाला सुगम संगीत, भक्ती संगीत, भाव संगीत, मराठी आणि हिंदी चित्रपटाचा सुवर्णकाळ म्हटल्यास वावगे होणार नाही.

स्वर गंधर्व सुधीर फडके उर्फ बाबूजी हे एक असे अलौकिक बहुआयामी व्यक्तिमत्व होते की त्यांचं नुसतं नाव जरी घेतलं तरी मराठी मनात आदराची भावना निर्माण होते. बाबूजींनी संगीत दिलेल्या अथवा गायलेल्या गीताचे मूळ गायकाकडून किंवा अन्य कलाकाराकडून गायलेल्या गाण्याचे सूर कानी पडले तरी रसिकांच्या मनाला आनंद देऊन जाते. मग प्रत्यक्ष बाबूजींच्याच आवाजात ते गाणं ऐकायला मिळालं तर दुधात साखरच!

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोध पर लेख हा कला शाखेचा असून यामध्ये १) सर्वेक्षण पद्धती २) तुलनात्मक पद्धती ३) विश्लेषणात्मक पद्धती इ. चा उपयोग केला आहे. तसेच या शोधपर लेखाकरिता माहितीचे संकलन करीत असताना अनेक संगीत पंडितांचे ग्रंथ, ऐतिहासिक ग्रंथ, चरित्र ग्रंथ तसेच प्रत्यक्ष मुलाखती व इंटरनेट द्वारा माहितीचे संकलन केले आहे.

**विश्लेषण** :

प्रस्तुत संशोधनामध्ये सुधीरजी फडके यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्वाचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

**महान संगीतकार बाबूजी :**

सुधीर फडके यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात 1941 साली एच.एम.व्ही. या संगीत क्षेत्रातील अग्रगण्य संस्थेतून केली. 1946 साली ते पुण्याच्या प्रभात चित्र संस्थेत संगीत दिग्दर्शक म्हणून रुजू झाले. तिथे त्यांनी अनेक हिंदी व मराठी चित्रपटांना संगीत दिले. तसेच अनेक चित्रपटांसाठी पार्श्वगायन सुद्धा केले. बाबूजींनी संगीत दिलेल्या चित्रपटांपैकी 1946 ला ' गोकुळ ' आणि 1947 ला देव आनंद व खुर्शीद अभिनीत ' आगे बढो ' दोन्ही प्रभात ची निर्मिती होय. आगे बढो सिनेमात गायिका माणिक वर्मा कडून नैन रसिले मदभरे , मै अलबेली नार हा मुजरा गाऊन घेतला. म. रफी आणि खुर्शीद यांनी गायलेले सावन की घटाओ , धीरे धीरे आना हे देखील खूपच श्रवणीय झाले आहे. संगीताच्या दुनियेत 50 चे दशक बाबूजींच्याच नावे झाले आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. त्याकाळी त्यांची प्रतिभा प्रखर तेजाने झळाळत होती. बाबूजींनी 50 च्या दशकात संगीत दिलेले उल्लेखनीय चित्रपट पुढील प्रमाणे १) माया बाजार (हिंदी) २) जनाबाई (हिंदी) ३)वंशाचा दिवा (मराठी) ४)पुढचं पाऊल (मराठी) ५) जशास तसे (मराठी) ६) मालती माधव (हिंदी) ७) मुरलीवाला (हिंदी) ८) लाखाची गोष्ट (मराठी) ९) नरवीर तानाजी (मराठी) १०) प्रतापगड (मराठी) ११) वहिनीच्या बांगड्या (मराठी) १२) रत्न घर (हिंदी) १३) पहली तारीख (हिंदी) १४) ऊन पाऊस (मराठी) १५) पोस्टातील मुलगी (मराठी) १६) शेवग्याच्या शेंगा (मराठी) १७) सजनी (हिंदी) १८) राम प्रतिज्ञा (मराठी) इत्यादी.

**बाबूजी एक श्रेष्ठ गायक :**

गायक म्हणूनही बाबूजी यांनी अनेक हिंदी मराठी चित्रपटांमध्ये पार्श्वगायन केले आहे. त्यापैकी काही चित्रपट अतिशय गाजली तर काही चित्रपटात नसलेले भावगीते व भक्तीगीते आहेत. काही उल्लेखनीय

पुढीलप्रमाणे - १) अशी पाखरे येती (भावगीत) २) अंतरीच्या गुढ गर्भी (भावगीत) ३) आकाशी झेप घे रे पाखरा (चित्रपट- आराम हराम है) ४) कुठे शोधिसी रामेश्वर (भावगीत) ५) उठ उठ पंढरीनाथा (चित्रपट- झाला महार पंढरीनाथ) ६) जग हे बंदी शाळा (चित्रपट- जगाच्या पाठीवर) ७) तुझं सगुण म्हणू की निर्गुण रे (संत गीत) ८) डाव मांडून मांडून मोडू नको (भावगीत) ९) तुझे रुप चित्ती राहो (चित्रपट - गोरा कुंभार) १०) तोच चंद्रमा नभात (भावगीत) ११) तुझे गीत गाण्यासाठी (भावगीत) १२) देव देव्हाऱ्यात नाही (चित्रपट- झाला महार पंढरीनाथ) १३) देहाची तिजोरी (चित्रपट- आम्ही जातो अमुच्या गावा) १४) प्रिया आज माझी नसे साथ द्याया (भावगीत) १५) बाई मी विकत घेतला शाम (चित्रपट- जगाच्या पाठीवर ) १६) यशवंत हो जयवंत हो (चित्रपट- भिंतीला कान असतात) १७) सखी मंद झाल्या तारका (भावगीत) १८) स्वर आले दुरुनी (भावगीत) १९) विठ्ठला तू वेडा कुंभार (चित्रपट- प्रपंच) इत्यादी.

### गीतरामायण :

बाबूजींच्या कारकिर्दीतील सर्वोच्च क्षण म्हणजे त्यांनी 1960 च्या दशकात स्वरबद्ध केलेले 'ग.दि.मां.' चे ' गीतरामायण '. गीतरामायण चे कार्यक्रम तेव्हा ऑल इंडिया रेडिओ वर वर्षभर प्रसारित होत होते. मराठी गीत रामायणात ग. दि.माडगूळकर यांनी एकूण 56 गाणी लिहिली आहे. आणि त्यामध्ये रामायणातले सर्व प्रसंग अतिशय ओघवत्या भाषेत वर्णन केले आहे. ते सर्व गाणी सुधीर फडके यांनी अतिशय सुंदर रित्या अनेक रागांमध्ये कंपोज करून पुणे आकाशवाणी केंद्रा वरून सादर केली. गीत रामायणाचे संपूर्ण भारतभर व भारताबाहेरही अनेक यशस्वी प्रयोग केले. म्हणूनच गीत रामायणाचे महान पर्व बाबूजींच्या जीवनातील पवित्र कार्य म्हणावे लागेल. त्यांचे गीत रामायणाचे गायन ऐकून **द्वारका पिठाचे शंकरराचार्य** यांनी बाबूजींना ' **स्वरश्री** ' या पदवीने गौरवित केले. गीत रामायणाचे रोप्य महोत्सवी समारंभाचे उद्घाटन करताना तत्कालीन **पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी** प्रामुख्याने उपस्थित होते. गीत रामायणाचे आजपर्यंत हिंदी, गुजराती, कन्नड, बंगाली, आसामी, तेलगू , मल्याळी, संस्कृत, कोकणी अशा विविध भाषांमध्ये भाषांतरे झालेली आहेत. या सर्व भाषांतराचे वैशिष्ट्य म्हणजे भाषांतर करत्यांनी त्याच्या अर्थामध्ये एका मात्रेचाही फरक केलेला नाही. ही सर्व भाषांतरे मूळ बाबूजींनी दिलेल्या चालीवरच गायली जातात. बाबूजींनी स्वतः त्यांच्या आयुष्यात गीतरामानाचे जवळजवळ 1800 प्रयोग केले आहेत.

### प्रखर देशभक्त बाबूजी :

श्री सुधीर फडके हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे निष्ठावान कार्यकर्ते होते. तसेच त्यांनी स्वातंत्र्यसंग्राम सैनिक म्हणूनही गोवा, पांडेचेरी, दिवदमन, या पोर्तुगीजांच्या जुलमी सत्तेला उलथून या प्रदेशांना स्वातंत्र्य

मिळविण्यासाठी बॅरिस्टर स्वातंत्र्यवीर सावरकरांसोबत भूमिगत राहून वेळप्रसंगी व्हायोलिन बॉक्समध्ये पिस्तूल पोचवून पोर्तुगीजांच्या लढ्यात महान कार्य केले. म्हणूनही बाबूजींचे स्वातंत्र्यसंग्राम सैनिक म्हणूनही कार्य मौलाचे आहे. अनेक समाजसेवी प्रकल्पांनाही त्यांनी भरभरून योगदान दिले. एकदा हुतात्मा चौकात एकट्याने दलित महिलेवर झालेल्या अत्याचाराच्या विरोधात लक्षणीय उपोषण केले. वीर सावरकरांवरील अतिउच्च प्रेमापोटी त्यांच्या जीवनावर ' '**स्वातंत्र्यवीर सावरकर** ' हा चित्रपट तयार केला.

## निष्कर्ष :

'स्वरगंधर्व स्वरश्री ' श्री सुधीर फडके हे महाराष्ट्रातील संगीतकार व गायक होते. त्यांना त्यांचे चाहते बाबूजी या नावानेच ओळखतात. त्यांनी जवळपास 50 वर्ष मराठी चित्रपट सृष्टीवर राज्य केले. तसेच त्यांचे सुगम संगीतातील प्रभुत्व अतुलनीय आहे. अशा महान कलावंताचे 29 जुलै 2002 साली निधन झाले. त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ संपूर्ण भारतभर अनेक कार्यक्रम होत असतात. त्यापैकी पिंपरी प्राधिकरण मधुगंधर्व संस्थेतर्फे शाहूनगर येथे ' सुधीर फडके स्मृती गायन स्पर्धा ' दरवर्षी घेण्यात येते. अशा अष्टपैलू बहुआयामी व्यक्तिमत्वास माझ्यासारख्या पामराचा मानाचा मुजरा.

## संदर्भ ग्रंथ सूची:


१) फडके, सुधीर (2003) , जगाच्या पाठीवर, राजहंस प्रकाशन , सदाशिव पेठ, पुणे - ३०

२) बांगरे, अरुण (1995) , ग्वालियर की संगीत परंपरा , यशोयश प्रकाशन , हुबळी (कर्नाटक)

३) देशपांडे, वामनराव (1974) , महाराष्ट्राचे संगीतातील कार्य म.रा. ग्रंथ निर्मिती मंडळ , नागपूर

४) जोशी, उमेश (1969 ) , भारतीय संगीतका इतिहास , मानसरोवर प्रकाशन , प्रतिष्ठान फिरोजाबाद , आग्रा , उ. प्र.

५) मुळे, भाग्यश्री ज्ञानेश ( 2019 ) , स्वर सुधीर , ज्ञानगंगा प्रकाशन , बुधवार पेठ , पुणे

६) वाळुंजकर, वसंत (2013) , स्वरश्री बाबूजी , दिलीप राज प्रकाशन , प्रा. लि. शनिवार पेठ , पुणे

७) माडगूळकर, ग. दि.(1957), प्रथम आवृत्ती, गीत रामायण, प्रकाशन विभाग / सूचना व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार.